# महाराष्ट्र शासन

शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,अवसरी खुर्द,

तालुका:आंबेगाव, जिल्हा: पुणे-४१२ ४०५.

दूरध्वनी क्रमांक: ०२१३३ २३०५८२. संकेतस्थळ:www.gcoeara.ac.in.

फॅक्स क्रमांक: ०२१३३ २३०५८३. ईमेल : office.gcoeavasari@dtemaharashtra.gov.in

**(स्वयंचल व यंत्र अभियांत्रिकी अभ्यासक्रम एनबीए, नवी दिल्ली मानांकित)**


जा.क्र.शाअवसंमअ/सा.प्रशासन/२०२४/ 1992 दिनांक: 15 JUL 2024

# परिपत्रक

सर्व विद्यार्थी , विभागप्रमुख व शिक्षक यांना कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयात दि.२०/०८/२०२४ व दि.२१ /०८/२०२४ रोजी **शाश्वत विकासासाठी ऊर्जा आणि पर्यावरण** या विषयावरील राष्ट्रीय परिषद अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या साह्याने(AICTE-VAANI-२०२४) चे आयोजन करण्यात येत आहे. सदर परिषदेचे संपूर्ण कामकाज मराठी भाषेतून होणार आहे. त्याअनुषंगाने सर्व विद्यार्थ्यांना आवाहन करण्यात येते की, सदर परिषदेकरिता आपले संशोधनपर निबंध विहित नुमन्यात सादर करण्यात यावे. अधिक माहितीकरीता राष्ट्रीय परिषदेसंबंधीबाबतचे माहिती पत्रक सोबत जोडण्यात येत आहे.

तसेच सर्व विभागप्रमुख व शिक्षक यांना या परिपत्रकाद्वारे सुचित करण्यात येते की, सदर राष्ट्रीय परिषदेचे माहितीपत्रक सर्व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून दयावे व विद्यार्थ्यांना सदर परिषदेत सहभाग नोंदविण्यासाठी प्रोत्साहीत करण्यात यावे.

**सोबत :** राष्ट्रीय परिषदेसंबंधीबाबतचे माहिती पत्रक

15-7-24

( डॉ.दि.रा.पानगव्हाणे)

प्राचार्य

शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,

अवसरी खुर्द,ता.आंबेगाव, जिल्हा-पुणे.

**प्रत:** १) सर्व मा.विभागप्रमुख—यंत्र/स्वयचंल/अणुविद्युत/उपकरणीकरण/संगणक/स्थापत्य/ कर्मशाळा/ ग्रंथालय/ उपयोजित विज्ञान/ कार्यालय/ भांडार/मुलींचे व मुलांचे वसतिगृह/प्रशिक्षण व आस्थापना अधिकारी/जिमखाना/ राष्ट्रीय सेवा योजना विभाग / प्रभारी सुरक्षा अधिकारी यांनी सदर परिपत्रक त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विद्यार्थी ,शिक्षक यांच्या निदर्शनास आणून द्यावे.

२)DPU —सदर परिपत्रक सर्व मा.विभाग प्रमुखांना ई-मेल द्वारे पाठविण्यात यावे तसेच संस्थेच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात यावे.

## सल्लागार समिती

| | |
|---|---|
| डॉ. सुनील भिरूड | कुलगुरू, सिओइपि तंत्रज्ञान विद्यापीठ |
| डॉ. विवेक सावंत | महाराष्ट्र नॉलेज कार्पोरेशन ली. पुणे |
| डॉ योगेश कुलकर्णी | संचालक, विज्ञान आश्रम पाबळ |
| डॉ संजय देशमुख | कुलगुरू, मुंबई विद्यापीठ |
| डॉ. दादासाहेब शेंडगे | H2e पावर सिस्टीम ली. पुणे |
| श्री. बी. ए. एन. मूर्ती | एटोन फ्लुइड पावर ली. पुणे |
| डॉ. कमल होरा | एमेरिटस प्रोफेसर, सिओइपि तंत्रज्ञान विद्यापीठ |
| डॉ. विठ्ठल बांदल | प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतन अवसरी |
| श्री अजय चांडक | प्रमोटर्स, रिसर्चर्स एंड इनोवेटर्स इन न्यू एंड क्लीन एनर्जी |
| डॉ. एस एस ठिपसे | ऑटोमोटिव रिसर्च एसोसिएशन ऑफ इंडिया, पुणे |

## परिषदे बाबत

शाविऊपराप २०२४ -'शाश्वत विकासासाठी ऊर्जा आणि पर्यावरण या क्षेत्रालील अद्यावत संशोधन आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाकरिता अंतर्दृष्टी विकसित करण्याचे प्रस्तावित करते. हि परिषद अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद नवी दिल्ली मार्फत AICTE-VAANI या योजने अंतर्गत प्रायोजित करण्यात येत आहे .प्रतिभावान संशोधक, अभियंते आणि व्यावसायिक यांच्या उपस्थितीमुळे हि परिषद ज्ञानार्जनाचे काम करेल .ऊर्जा रूपांतरण आणि पर्यावरण संरक्षणासाठी ही एक उदयोन्मुख तांत्रिक परिषद आहे. शाविऊपराप २०२४-मध्ये तांत्रिक सादरीकरण , परस्परसंवादी सत्रे आणि प्रदर्शन यांचा समावेश असेल. विविध उद्योगांचे परस्परसंवादी नेटवर्किंग वातावरण निर्माण करणारे अत्याधुनिक तंत्रज्ञान , उत्पादने आणि उपाय सादर होतील.

## आयोजन समिती

| | |
|---|---|
| डॉ. नवनाथ नेहे | डॉ. शशी घुमरे |
| डॉ. मनोज नागमोडे | डॉ. वासुदेव देऊलकर |
| डॉ. मच्छिंद्र पाबळे | डॉ. सदानंद देशपांडे |
| डॉ. वंदना इनामदार | डॉ. स्वप्नील खरमाळे |

## संस्थे विषयी

शासकीय अभियांत्रिकी आणि संशोधन महाविद्यालय , अवसरी ( खु), ता. - आंबेगाव, जि. - पुणे हि संस्था महाराष्ट्र शासनाने ऑगस्ट 2009 मध्ये स्थापन केली असून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद , नवी दिल्ली तर्फे मान्यता प्राप्त आहे. संस्था स्वयंचल, स्थापत्य, अणुविद्युत व दूरसंचार, संगणक, उपकरणीकरण व नियंत्रण आणि यंत्र अभियांत्रिकी या विषयांमध्ये पदवी कार्यक्रम राबविते. १६०० हून अधिक विद्यार्थी पर्यावरणपूरक संकुलामध्ये शिक्षण घेत आहेत. संस्था ROBOCON, SAE Collegiate Chapter, TIFAN इत्यादी उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक वातावरण प्रदान करते.

## शोधनिबंधा करिता आवाहन

लेखकांना विनंती आहे की त्यांनी त्यांचे गोषवारे/संपूर्ण लांबीचे पेपर खालील वेबसाइटवर उपलब्ध असलेल्या विहित नमुन्यात सादर करावेत.

https://easychair.org/conferences/?conf=nceesd2024

हे काम आयएसबीएन क्रमांक असलेल्या कॉन्फरन्स प्रोसिडिंगमध्ये प्रकाशित केले जाईल.

## संपर्क साधा

Email: nceesd2024@gcoeara.ac.in

९४२२५२१३७५, ९८२२५०४२३०, ९१८२७०४०७४

Conference website: https://gcoeara.ac.in/nceesd2024/

## शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खु)

तालुका:आंबेगाव, जिल्हा: पुणे – ४१२४०५

www.gcoeara.ac.in

### द्वितिय घोषणा

# शाश्वत विकासासाठी ऊर्जा आणि पर्यावरण: द्वितीय राष्ट्रीय परिषद-२०२४

(प्रायोजक: AICTE-VAANI)

दिनांक २०–२१ ऑगस्ट २०२४

### विशेष संरक्षक

प्रा. (डॉ) टी जी सिथाराम, अध्यक्ष, अभातंशिप, नवी दिल्ली; श्री विकास रस्तोगी, प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई; डॉ. विनोद मोहितकर, संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई; डॉ. दत्तात्रय जाधव, सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

### अध्यक्ष

डॉ. दिलीप पानगव्हाणे, प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खु)

### निमंत्रक

डॉ शरद क्षीरसागर, विभाग प्रमुख, यंत्र अभि.

### संघटन सचिव

डॉ. चंद्रशेखर सेवतकर

### संघटन सहसचिव

डॉ. मनीषा खळदकर (शैक्षणिक)

डॉ. निवेदिता वाघ (मराठी भाषा अधिकारी)

## शाविऊपराप २०२४-चे विषय

**Vibrant Advocacy for Advancement and Nurturing of Indian Languages या अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली** पुरस्कृत योजनेचा एक महत्वाचा भाग म्हणून **शाश्वत विकासासाठी ऊर्जा आणि पर्यावरण -२०२४** हि राष्ट्रीय परिषद मराठी भाषेतून आयोजित केली जात आहे. ही परिषद प्राध्यापक, विद्यार्थी आणि उद्योग व्यावसायिकांना अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील त्यांचे योगदान आणि संशोधन प्रदर्शित करण्यासाठी एक संधी आणि व्यासपीठ प्रदान करेल. NSEESD 2024 मध्ये खालील ट्रॅक समाविष्ट आहेत:

ट्रॅक १: हा ट्रॅक ऊर्जा क्षेत्रातील विविध मूलभूत समस्या आणि दृष्टीकोन यांचेशी निगडीत असेल . तसेच प्रगत नियंत्रण आणि देखरेख तंत्रज्ञान, प्रगत ऊर्जा तंत्रज्ञान; ऊर्जा कार्यक्षमता; ऊर्जा बाजार ; ऊर्जा धोरण , उर्जा अर्थशास्त्र, नियोजन आणि नियम ; एकात्मिक ऊर्जा प्रणाली ; ऊर्जा आणि कार्बन उत्सर्जनाचे मॉडेलिंग, सिम्युलेशन आणि अंदाज; नूतनीकरणक्षम ऊर्जेसाठी नॅनो-तंत्रज्ञान अनुप्रयोग ; स्मार्ट ग्रिड; टिकाऊ शहरे आणि टिकाऊ इमारती इत्यादी बाबत या ट्रॅकची व्याप्ती असेल.

ट्रॅक २: पर्यावरणातील मूलभूत समस्या , त्याचे संरक्षण , नियम आणि त्यात समाविष्ट आहे: बायोमास आणि बायो-आधारित उत्पादने ; कार्बन किंमत ; इको-डिझाइन आणि इको-कार्यक्षमता ; पर्यावरण आणि जैव-विविधता संवर्धन; पर्यावरणाच्या प्रभावाचे मूल्यांकन ; जोखीम मूल्यांकन आणि टिकाऊ समुदाय.

ट्रॅक ३: हा ट्रॅक टिकाऊपणासाठी मानवी वर्तणुकीच्या पैलूंसारख्या आवश्यक गोष्टींना संबोधित करेल ; आव्हाने, अडथळे आणि संधी ; पर्यावरण अनुकूल संस्था ; कॉलेज समुदाय भागीदारी ; अभ्यासक्रमात टिकाव ; खाजगी उद्योगाद्वारे शाश्वतता शिक्षण आणि शिक्षण आणि शाश्वत विकास इत्यादी.

### महत्वाच्या तारखा

| | |
|---|---|
| पूर्ण लांबीचा पेपर सादर करणे | २० जुलै २०२४ |
| **पुनर्विलोकन बाबत सूचना** | **३० जूलै २०२४** |
| **अंतिम पेपर सबमिशन** | **१० ऑगस्ट २०२४** |
| **अंतिम स्वीकृतीची सूचना** | **०५ ऑगस्ट २०२४** |
| **नोंदणीचा अंतिम दिनांक** | **१२ ऑगस्ट २०२४** |
| **परिषदेची तारीख** | **२० - २१ ऑगस्ट २०२४** |

### नोंदणी फी

सदर परीषद हि अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली तर्फे AICTE-VAANI (Vibrant Advocacy tor Advancement and Nurturing of Indian Languages) या योजने अंतर्गत प्रायोजित करण्यात येत असल्याने या परिषदेत आपले शोध निबंध प्रकाशित करणे तसेच सहभाग घेणे पूर्णतः विनामुल्य आहे. तथापि या परिषदे करिता उपस्थित सहभागी व्यक्तीस त्यांचा प्रवास खर्च व राहण्याचा खर्च स्वतःचा स्वतः करायचा आहे.

परिषदे दरम्यान सकाळचा नाश्ता, दुपारचे जेवण इत्यादीची व्यवस्था असेल.

### राहण्याची सोय

सहभागींना वसतिगृहात राहण्याची सोय केली जाईल. कॉन्फरन्स स्थळाजवळ माफक दरात हॉटेल्सही उपलब्ध आहेत.

### परिषदेचे ठिकाण:

सेमिनार हॉल , यंत्र अभियांत्रिकी विभाग , शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय , अवसरी (खु) , तालुका: आंबेगाव, जिल्हा: पुणे- ४१२४०५

### दिशादर्शक:




शासकीय अभियांत्रिकी आणि संशोधन महाविद्यालय अवसरी (ख) हे पुण्यापासून नाशिक रस्त्याने ६२ किमी अंतरावर आहे.

**जवळचे रेल्वे स्टेशन: पुणे स्टेशन**
**जवळचे विमानतळ: लोहगाव विमानतळ, पुणे**
**जवळचे बसस्थानक: मंचर**

### पर्यटन आकर्षणे

भीमाशंकर मंदिर, लेण्याद्री, नाणेघाट, लोणावळा, शिवनेरी किल्ला, ओझर मंदिर, आहुपे, निगोज रांजणखळगे आणि बरेच काही..